पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे आयोजित कार्यक्रमात गानकोकिळा लता मंगेशकर यांना श्रद्धांजली वाहताना शिक्षक, विद्यार्थी. (छाया : पप्पू अत्तार)

# विद्यापीठात संगीत, नाट्यशास्त्र विभागातर्फे लता मंगेशकर यांना श्रद्धांजली

**कोल्हापूर :** भारतरत्न गानकोकिळा लता मंगेशकर यांना शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली. याप्रसंगी विभागातील प्रा.डॉ. विनोद ठाकूर-देसाई, निखिल भगत, डॉ. सचिन कचोटे, संदेश गावंदे आदींनी लतादीदींच्या आठवणींना उजाळा दिला. लता मंगेशकर यांचा प्रत्यक्ष आशिर्वाद लाभलेली व विभागातील विद्यार्थिनी ऋचा गावंदेने 'तू जहाँ जहाँ चलेगा' या गाण्याचे कडवे गाऊन स्वरांजली वाहिली. याप्रसंगी विभागातील विविध शाखांचे विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

लोकमत

# दुसऱ्या दिवशी ४७ हजार विद्यार्थ्यांची 'मॉक टेस्ट'

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळातर्फे बुधवारी आयोजित केलेली ऑनलाईन सराव चाचणी (मॉक टेस्ट) ४७,११९ विद्यार्थ्यांनी दिली. परीक्षा मंडळाने ६७०४० विद्यार्थ्यांची चाचणी घेण्याचे नियोजन केले होते. या चाचणीच्या सुरुवातीला काहीवेळा लॉगीन न होण्याची तांत्रिक अडचण विद्यार्थ्यांना जाणवली. त्यांनी परीक्षा मंडळाशी संपर्क साधल्यानंतर ही अडचण दूर करण्यात आली.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने हिवाळी सत्रातील परीक्षा ऑनलाईन घेण्याचे नियोजन केले आहे. त्याच्या स्वरूपाची विद्यार्थ्यांना माहिती होण्याच्या उद्देशाने परीक्षा मंडळाने सराव चाचणीचे आयोजन केले आहे. त्यात मंगळवारी तांत्रिक अडचणीमुळे सुमारे ४० हजार विद्यार्थ्यांना चाचणी देता आली नव्हती. त्यावर परीक्षा मंडळाने त्यांची चाचणी बुधवारी सकाळी दहा ते दुपारी बारा यावेळेत घेण्याचे नियोजन केले. त्याबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. नियोजनानुसार सकाळी दहा वाजता चाचणीची प्रक्रिया सुरू झाली. मात्र, प्रारंभी काहीवेळ लॉगीन होत नसल्याची तांत्रिक अडचण विद्यार्थ्यांना आली. त्यांनी परीक्षा मंडळाच्या वॉररूममध्ये संपर्क साधल्यानंतर त्यांची अडचण दूर करण्यात आली.

## 'वॉर्निंग'चा संदेश

सराव चाचणी देताना विद्यार्थ्यांच्या हालचालींवर ऑनलाईन लक्ष ठेवण्यात आले होते. त्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता संगणकप्रणालीचा वापर करण्यात आला. विद्यार्थ्यांनी हालचाल केल्यानंतर त्यांच्या स्मार्टफोन, लॅपटॉप, संगणकाच्या स्क्रीनवर वारंवार 'वॉर्निंग'बाबतचा संदेश येत होता.